परीक्षा व्यवस्थेत प्रश्नपत्रिका सुरक्षेसह पारदर्शकतेवर भर

अभाविपच्या गोलमेज परिषदेत कृत्रिम बुद्धिमत्ता, मूल्यमापन आणि तक्रार निवारणावर चर्चा

मुंबई, दि. ११ (प्रतिनिधी) : देशातील सार्वजनिक आणि स्पर्धात्मक परीक्षांची विश्वासार्हता अधिक बळकट करण्यासाठी परीक्षा व्यवस्था पारदर्शक, सुरक्षित, उत्तरदायी आणि विद्यार्थी-केंद्रित करण्याची गरज शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांनी व्यक्त केली. अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप), मुंबई आणि विद्यार्थी निधी ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने 'सार्वजनिक परीक्षांमधील सुधारणा : गोलमेज परिषद' आयोजित करण्यात आली होती. मुंबईतील रामनारायण रुईया महाविद्यालयाच्या परिषद कक्षात झालेल्या या परिषदेत प्रश्नपत्रिका सुरक्षा, मूल्यमापन प्रक्रिया, निकालातील पारदर्शकता, कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर आणि विद्यार्थ्यांसाठी प्रभावी तक्रार निवारण यंत्रणा यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

अलीकडील नीट परीक्षेच्या पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणावर घेतल्या जाणाऱ्या परीक्षांच्या व्यवस्थेतील त्रुटी आणि आव्हाने पुन्हा चर्चेत आली आहेत. या पार्श्वभूमीवर परीक्षा सुधारणा केवळ प्रश्नपत्रिका तयार करण्याची किंवा परीक्षा घेण्याची पद्धत बदलण्यापुरती मर्यादित न ठेवता प्रश्नपत्रिका निर्मितीपासून सुरक्षित वितरण, परीक्षा आयोजन, मूल्यमापन, निकाल जाहीर करणे आणि तक्रारींचे निराकरण या संपूर्ण प्रक्रियेत करण्याची आवश्यकता परिषदेत अधोरेखित करण्यात आली. प्रश्नपत्रिका निर्मिती, वितरण आणि सुरक्षिततेसाठी सक्षम यंत्रणा तसेच विविध स्तरांवरील पडताळणी अधिक प्रभावी करण्यावर भर देण्यात आला.

अभाविपचे राष्ट्रीय उपाध्यक्ष प्रा. मंदार भानुशे यांनी परीक्षा व्यवस्थेतील पारदर्शकता आणि विद्यार्थ्यांचा व्यवस्थेवरील विश्वास यांना सर्वोच्च प्राधान्य देण्याची गरज व्यक्त केली. परीक्षा ही केवळ विद्यार्थ्यांच्या स्मरणशक्तीची चाचणी न राहता त्यांच्या आकलन, चिकित्सक विचार, कौशल्ये, सर्जनशीलता आणि ज्ञानाचा प्रत्यक्ष उपयोग करण्याच्या क्षमतेचे मूल्यमापन करणारी प्रक्रिया असावी, असे त्यांनी सांगितले. परीक्षा सुधारणांसाठी शासन, परीक्षा यंत्रणा, विद्यापीठे, महाविद्यालये,



शिक्षक, विद्यार्थी आणि शिक्षणतज्ज्ञांनी एकत्रितपणे काम करण्याची आवश्यकता असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

आयआयएम मुंबईचे संचालक मनोज तिवारी यांनी संस्थेतील परीक्षा व्यवस्थेचे सादरीकरण केले. प्रश्नपत्रिका निर्मिती, सुरक्षितता, परीक्षा आयोजन, विविध स्तरांवरील नियंत्रण व पडताळणी, मूल्यमापन आणि निकाल जाहीर करण्यापर्यंतची प्रक्रिया त्यांनी उपस्थितांसमोर मांडली. स्पष्ट कार्यपद्धती, जबाबदाऱ्यांचे योग्य विभाजन, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि बहुस्तरीय पडताळणी यामुळे परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता व विश्वासार्हता निर्माण करता येते, याचे उदाहरण त्यांनी दिले.

परीक्षा व्यवस्थेत कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करताना मानवी देखरेख, अचूकता आणि विद्यार्थ्यांची गोपनीयता यांची काळजी घेणे आवश्यक असल्याचेही परिषदेत नमूद करण्यात आले. मोठ्या प्रमाणावरील परीक्षांसाठी सुरक्षित डिजिटल प्रणालींचा वापर, क्षमताधारित आणि अनुप्रयोगाधारित मूल्यमापन, सातत्यपूर्ण मूल्यमापन तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी अधिक सुलभ व समावेशक परीक्षा व्यवस्था उभारण्यावर भर देण्यात आला. विद्यार्थ्यांचा मानसिक ताण कमी करण्यासाठी सहाय्य आणि समुपदेशन व्यवस्था बळकट करण्याची तसेच स्वतंत्र, प्रभावी आणि वेळबद्ध तक्रार निवारण यंत्रणा निर्माण करण्याची मागणीही करण्यात आली.

या परिषदेस अभाविप कोकण प्रदेश अध्यक्ष वैद्य. कैलास सोनमनकर, प्रदेश उपाध्यक्ष डॉ. अपर्णा कुलकर्णी, मुंबई महानगर अध्यक्ष प्रा. संदीप शिंदे, मंत्री अभिषेक पवार आणि संघटनमंत्री अमित पटले यांच्यासह मुंबईतील विविध विद्यापीठे व महाविद्यालयांचे प्राध्यापक, सिनेट सदस्य, प्राचार्य, संस्थाचालक, परीक्षा नियंत्रक, विद्यार्थी प्रतिनिधी आणि शिक्षणतज्ज्ञ उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित परीक्षा व्यवस्था अधिक निष्पक्ष, पारदर्शक, सुरक्षित आणि विश्वासार्ह करण्यासाठी विविध घटकांनी एकत्रितपणे पुढाकार घेण्याची गरज यावेळी व्यक्त करण्यात आली.

इंजिनिअरांच्या रिकाम्या खुर्च्या शौचालयात ठेवून आंदोलन

अंबरनाथ, दि. ११ (प्रतिनिधी) : गणेशोत्सवाला अवघे तीन दिवस शिल्लक असताना अंबरनाथ शहरातील खड्डेमय आणि खराब रस्त्यांची दुरुस्ती अद्याप न झाल्याच्या निषेधार्थ नगरसेवक विकास सोमेश्वर यांनी अंबरनाथ नगरपरिषद कार्यालयात अनोख्या पद्धतीने आंदोलन केले. नगरपरिषदेच्या बांधकाम विभागातील अधिकारी कार्यालयात उपस्थित नसल्याचा आरोप करत सोमेश्वर यांनी अधिकाऱ्यांच्या रिकाम्या खुर्च्या थेट शौचालयात नेऊन ठेवल्या. त्यानंतर संबंधित इंजिनिअरच्या केबिनसमोर जमिनीवर बसून त्यांनी आंदोलन केले. शहरातील खराब रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, यासाठी नगरपरिषद प्रशासनाला यापूर्वी अनेक वेळा निवेदने देण्यात आली होती. मात्र, त्यानंतरही रस्त्यांच्या दुरुस्तीचे काम अपेक्षित वेगाने झाले नसल्याने सोमेश्वर यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

पोलीस सुरक्षा काढल्याबद्दल रामराज पांडे यांचे पोलीस प्रशासनाला प्रश्न

विरार, दि. ११ (प्रतिनिधी) : भ्रष्टाचाराची प्रकरणे उघडकीस आणल्यामुळे आपल्या जीवाला धोका असल्याचा दावा करणारे प्रदीप रामराज पांडे यांनी आपली २४ तासांची पोलीस सुरक्षा काढून घेतल्याबद्दल पोलीस प्रशासनाकडे गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. मात्र, ६ जुलै ते ९ सप्टेंबर २०२६ या कालावधीत ही सुरक्षा पूर्णपणे काढून घेण्यात आली आणि १० सप्टेंबर रोजी ती अचानक पुन्हा सुरू करण्यात आल्याचे पांडे यांनी म्हटले आहे. पांडे यांच्या म्हणण्यानुसार, त्यांनी १० ऑगस्ट आणि ३ सप्टेंबर २०२६ रोजी पोलीस आयुक्तांसह वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना ई-मेलद्वारे आपल्या जीवाला गंभीर धोका असल्याची भीती व्यक्त केली होती.

तसेच एका कथित हत्येच्या कटाचाही उल्लेख केल्याचे त्यांनी सांगितले. यापूर्वीपासून न्यायालयाच्या आदेशानुसार सुरक्षा व्यवस्था असताना आणि संभाव्य धोक्याची माहिती वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना देण्यात आलेली असतानाही २४ तासांची सुरक्षा अचानक काढून घेण्याचा निर्णय का घेण्यात आला, असा सवाल पांडे यांनी उपस्थित केला आहे. सुरक्षा काढून घेण्याचा निर्णय कोणाच्या आदेशाने घेण्यात आला, त्यामागे कोणती परिस्थिती होती किंवा कोणाचा दबाव होता का, याबाबतही त्यांनी पोलीस प्रशासनाकडून स्पष्टीकरण मागितले आहे.

ग्लोबल रुग्णालयाच्या राखीव खाटांवरून पालिकेला १५० कोटींच्या नुकसानीचा आरोप

मुंबई, दि. ११ (प्रतिनिधी) : परळ येथील ग्लेनेगल्स ग्लोबल रुग्णालयाला वाढीव बांधकाम क्षेत्र मंजूर करताना घालण्यात आलेल्या १५ टक्के राखीव खाटांच्या अटीचे २०१२ पासून कथितरीत्या उल्लंघन होत असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणामुळे मुंबई महापालिकेचे १०० ते १५० कोटी रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याचा दावा करण्यात आला असून, रुग्णालय व्यवस्थापनाशी केवळ १५ ते २० कोटी रुपयांत तडजोड करून प्रकरण निकाली काढण्याचा प्रयत्न सुरू असल्याची तक्रार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महापालिका आयुक्तांकडे करण्यात आली आहे.

आयुष्यमान भारताच्या मुंबई उपनगर जिल्हा संनियंत्रण व तक्रार निवारण समितीचे राज्य सचिव विधिज्ञ भिमेश मुतुला यांनी हा मुद्दा उपस्थित केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, २०१२ मध्ये ग्लोबल रुग्णालयाला सुमारे ९ हजार ३५७ चौरस मीटर वाढीव बांधकाम क्षेत्र मंजूर करण्यात आले होते. या सवलतीच्या बदल्यात रुग्णालयाने महापालिकेने पाठविलेल्या तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील गरजू रुग्णांसाठी १५ टक्के खाटा राखीव ठेवणे बंधनकारक होते. मात्र, या अटीचे गेल्या १४ वर्षांत योग्य प्रकारे पालन झाले का, याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे.

२०१२ पासून आतापर्यंत राखीव खाटांचा नेमका किती सामान्य व गरजू रुग्णांना लाभ मिळाला, तसेच महापालिकेने शिफारस केलेल्या किती रुग्णांवर सवलतीच्या दरात उपचार करण्यात आले, याचा तपशील सार्वजनिक करण्याची मागणी करण्यात आली आहे. या संपूर्ण कालावधीतील व्यवहार आणि रुग्णालयाने अटींचे केलेले पालन याबाबत विशेष न्यायवैद्यक आर्थिक तपासणी अर्थात फॉरेन्सिक लेखापरीक्षण करून सखोल चौकशी करावी, अशी मागणी मुतुला यांनी केली आहे.

दरम्यान, नियमांचे कथित उल्लंघन होत असतानाही रुग्णालयाला वारंवार परवानग्या देणाऱ्या संबंधित महापालिका अधिकाऱ्यांचीही चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. जुन्या करारातील अटींचा हिशेब आणि अनुपालन पूर्णपणे तपासल्याशिवाय रुग्णालयासोबत कोणताही नवा करार करू नये, अशी भूमिका मुतुला यांनी मांडली आहे. प्रशासनाने चौकशी न करता नव्या करारासाठी पुढाकार घेतल्यास तीव्र धरणे आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

FEDBANK FINANCIAL SERVICES LIMITED
फेडबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड. ताबा नोटीस

नोंदणीकृत कार्यालयः युनिट क्र. ११०१, ११ वा मजला, सिग्नस, प्लॉट क्र. ७१ ए, पवई, पसपोली, मुंबई - ४०००८७

ज्याअर्थी, फेडबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेडचे प्राधिकृत अधिकारी म्हणून खालील स्वाक्षरीकर्त्यांनी, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अक्ट, २००२ (२००२ चा ५४) अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ३ सह वाचल्या जाणाऱ्या कलम १३(१२) अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून खाली नमूद केलेली मागणी नोटीस बजावली होती, ज्याद्वारे खालील कर्जदारांना सदर नोटीस प्राप्त झाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत नोटिशीत आणि खाली नमूद केलेल्या रकमेची परतफेड करण्याचे आवाहन करण्यात आले होते. खालील कर्जदार सदर रकमेची परतफेड करण्यात अपयशी ठरल्यामुळे, याद्वारे खालील कर्जदारांना आणि सर्वसामान्य जनतेला नोटीस देण्यात येते की, खालील स्वाक्षरीकर्त्यांनी सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या कलम १३ च्या उप-कलम (४) अंतर्गत त्यांना प्राप्त अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तांचा ताबा घेतला आहे.

	कर्ज खाते क्र. / कर्जदार / सह-कर्जदार / हमीदार
१.	**कर्ज खाते क्र. FEDKCSOHL0511933. :- (१) सलमान अज्जन खान (कर्जदार); (२) अहमदुन निशा (सह-कर्जदार) | मागणी नोटिशीची तारीख आणि रक्कमः २३/०५/२०२६ आणि रु. २०,२७,८७३/- (अक्षरी रुपये वीस लाख सत्तावीस हजार आठशे त्र्याहत्तर मात्र), जे १९/०५/२०२६ रोजी असल्याप्रमाणे | ताब्याची तारीख आणि प्रकारः ०९-०९-२०२६ आणि सांकेतिक ताबा | अनुसूची I गहाण मालमत्तेचे वर्णन**: गहाण मालमत्तेचा सर्व भाग आणि पार्सल ज्यामध्ये फ्लॅट क्र. २०३, ज्याचे क्षेत्रफळ ४९० चौ. फूट, २ रा मजला सलमा अपार्टमेंट, स. क्र. ३०, हिस्सा क्र. ५, सीटीएस क्र. ४४०३/२, मौजे निजामपूर भिवंडी, ठाणे - ४२१३०२, महाराष्ट्र यांचा समावेश आहे.
२.	**कर्ज खाते क्र. FEDKCSSTL0524291. (१) आरेफाबी यासाली अन्सारी (कर्जदार); (२) यासाली अब्दुल सत्तार अन्सारी (सह-कर्जदार); (३) तन्वीर यासाली अन्सारी (सह-कर्जदार) | मागणी नोटिशीची तारीख आणि रक्कमः २३/०५/२०२६ आणि रु. २०,१८,०४३/- (अक्षरी रुपये वीस लाख अठरा हजार त्रेचाळीस मात्र), जे १९/०५/२०२६ रोजी असल्याप्रमाणे | ताब्याची तारीख आणि प्रकारः ०९-०९-२०२६ आणि सांकेतिक ताबा | अनुसूची I गहाण मालमत्तेचे वर्णन**: गहाण मालमत्तेचा सर्व भाग आणि पार्सल ज्यामध्ये सिल्व्हर अपार्टमेंट को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीत तळमजल्यावर स्थित शॉप क्र. ७, ज्याचे बिल्ट-अप क्षेत्रफळ ३५१ चौ. फूट किंवा ३२.६२ चौ. मीटर आहे, घर क्र. १२६८/१/जी०७, जे सर्व्हे क्र. ४३/ए/५ वरील जमिनीवर बांधले आहे, शफीक कंपाउंड, मौजे टेमघर, तालुका भिवंडी, शाष्टी नागाव १, ठाणे - ४२१३०२, महाराष्ट्र यांचा समावेश आहे. सीमा खालीलप्रमाणेः पूर्वः फ्लॅट क्र. १; पश्चिमः २० फुटी रस्ता; उत्तरः मार्जिन लँड; दक्षिणः शॉप क्र. ०६.
३.	**कर्ज खाते क्र. FEDPVLOHL0494319. (१) ओंकार वासुदेव गुप्ता (कर्जदार); (२) पूजा ओंकार गुप्ता (सह-कर्जदार) | मागणी नोटिशीची तारीख आणि रक्कमः २३/०५/२०२६ आणि रु. २०,७६,४३७/- (अक्षरी रुपये वीस लाख शहात्तर हजार चारशे सदतीस मात्र), जे १९/०५/२०२६ रोजी असल्याप्रमाणे | ताब्याची तारीख आणि प्रकारः ०९-०९-२०२६ आणि सांकेतिक ताबा | अनुसूची I गहाण मालमत्तेचे वर्णन**: गहाण मालमत्तेचा सर्व भाग आणि पार्सल ज्यामध्ये फ्लॅट क्र. ५०३, ५ वा मजला, ज्याचे क्षेत्रफळ ३८७ चौ. फूट आहे, इमारत क्र. १७ सेक्टर २, नेपच्यून स्वराज्य बिल्डिंग सेक्टर २ बिल्डिंग क्र. १७ को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड, आंबिवली, कल्याण, ठाणे - ४२११०२, महाराष्ट्र यांचा समावेश आहे. सीमा खालीलप्रमाणेः पूर्वः उंबर्डे कडे जाणारा गावाचा रस्ता; पश्चिमः प्लॉट क्र. ११ आणि १२; उत्तरः स. क्र. ५७ भाग (Pt) आणि अंतर्गत रस्ता; दक्षिणः प्लॉट क्र. १३ आणि ८.
४.	**कर्ज खाते क्र. FEDKCSSTL0516396. (१) सच्चिदानंद राजाराम केणे (कर्जदार); (२) तेजस सच्चिदानंद केणे (सह-कर्जदार); (३) अनिता सच्चिदानंद केणे (सह-कर्जदार) | मागणी नोटिशीची तारीख आणि रक्कमः १३/०५/२०२६ आणि रु. २०,४४,७८२/- (अक्षरी रुपये वीस लाख चव्वेचाळीस हजार सातशे ब्याऐंशी मात्र), जे १३/०५/२०२६ रोजी असल्याप्रमाणे | ताब्याची तारीख आणि प्रकारः ०९-०९-२०२६ आणि सांकेतिक ताबा | अनुसूची I गहाण मालमत्तेचे वर्णन**: गहाण मालमत्तेचा सर्व भाग आणि पार्सल ज्यामध्ये घर क्र. ६६ मधील केवळ तळमजल्यावरील परिसर, ज्याचे बिल्ट अप क्षेत्रफळ सुमारे १२०० चौ. फूट आहे आणि जे मौजे गोरसई, भिवंडी, ठाणे - ४२१३०२, महाराष्ट्र येथे स्थित आहे, त्याचा समावेश आहे. सीमा खालीलप्रमाणेः पूर्वः आत्माराम दादू केणे यांचे घर; पश्चिमः नारायण नामदेव केणे यांचे घर; उत्तरः पंडित पांडुरंग केणे यांचे घर; दक्षिणः नरेश मोतीराम केणे यांचे घर.

विशेषतः कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सावध करण्यात येते की, त्यांनी या मालमत्तेसोबत कोणताही व्यवहार करू नये आणि मालमत्तेसोबत केलेला कोणताही व्यवहार हा वर नमूद केलेली रक्कम आणि त्यापुढील व्याजासाठी फेडबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेडच्या प्रभाराच्या अधीन राहील. तारण मालमत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात, कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) कडे वेधले जात आहे.

सही/-
प्राधिकृत अधिकारी,
फेडबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड

ठिकाणः मुंबई,
दिनांकः ०९.०९.२०२६

जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड (परिसमापनात)

नोंदणीकृत कार्यालय - स्टर्लिंग सेंटर, ४०१-४०७, ४ था मजला, डिव्हाईन चाईल्ड हायस्कूलसमोर, अंधेरी कुर्ला रोड, चकाला, अंधेरी पूर्व, मुंबई - ४०००९३
सीआयएन : L99999MH1992PLC066213
(माननीय एनसीएलटी च्या दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ च्या आदेशानुसार परिसमापन प्रक्रियेतून जात असलेली कंपनी)

ई-लिलावांसाठी सार्वजनिक घोषणा

इन्सॉल्व्हन्सी अँड बँक्रप्टसी कोड, २०१६, आणि त्याअंतर्गत तयार केलेल्या नियमांनुसार नोटीस

याद्वारे खालील स्वाक्षरीकर्त्यांकडून सर्वसामान्य जनतेला नोटीस देण्यात येते की, इन्सॉल्व्हन्सी अँड बँक्रप्टसी कोड, २०१६ ("आयबीसी") च्या तरतुदींनुसार आणि त्याअंतर्गत तयार केलेल्या नियम आणि नियमावलीसह वाचल्या जाणाऱ्या, जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड (परिसमापनात) ("कॉर्पोरेट ऋणको") च्या मालकीच्या आणि कॉर्पोरेट ऋणकोच्या परिसमापन इस्टेटचा भाग असलेल्या २ (दोन) मालमत्तांच्या (खालील तक्त्यामध्ये वर्णन केलेल्या) विक्रीसाठी ई-लिलावाद्वारे बोली मागविण्यात येत आहेत. ही विक्री कोणत्याही सादरीकरण, हमी किंवा नुकसानभरपाईशिवाय 'जसे आहे जिथे आहे', 'जसे आहे जे आहे', 'जसे आहे तसे आहे', 'जे काही आहे तिथे', आणि 'कोणत्याही दाव्याशिवाय' या तत्त्वावर केली जाईल.

ही विक्री खालील स्वाक्षरीकर्त्यांद्वारे ई-लिलाव प्लॅटफॉर्म बँकनेट (पूर्वीचे ई-बी-क्रय) च्या https://ibbi.baanknet.com ("ई-लिलाव प्लॅटफॉर्म") वरून, इतर बाबींबरोबरच, आयबीबीआय (लिक्विडेशन प्रोसेस) रेग्युलेशन्स, २०१६ च्या नियम ३२ आणि दिनांक १२ सप्टेंबर २०२६ च्या असेट सेल प्रोसेस मेमोरेंडा ("एएसपीएम") नुसार केली जाईल. सर्व इच्छुक बोलीदारांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सर्व पात्रता कागदपत्रे आणि इसारा अनामत रक्कम संबंधित एएसपीएमच्या कलम ४ (पात्रता कागदपत्रे) मध्ये नमूद केलेल्या कागदपत्र सादरीकरणाच्या आवश्यकतांनुसार काटेकोरपणे आणि केवळ ई-लिलाव प्लॅटफॉर्मवरच सादर करावीत.

ई-लिलावासाठी महत्त्वाच्या तारखांचे वेळापत्रक	
ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर पात्रता कागदपत्रे आणि कलम २९ए अंतर्गत हमीपत्र सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ	**सोमवार, १२ ऑक्टोबर २०२६, सायंकाळी ५:०० (यूटीसी +५:३०)**
ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर इसारा अनामत रक्कम (**"ईएमडी"**) जमा करण्याची अंतिम तारीख आणि वेळ	**सोमवार, १२ ऑक्टोबर २०२६, सायंकाळी ६:०० (यूटीसी +५:३०)**
ई-लिलावाची तारीख आणि वेळ	**गुरुवार, १५ ऑक्टोबर २०२६, सकाळी ११:०० ते सायंकाळी ५:०० (यूटीसी +५:३०)**
अंतिम विक्री मोबदला भरण्याची अंतिम तारीख	खालील स्वाक्षरीकर्त्यांद्वारे अंतिम विक्री मोबदला भरण्यासाठी मागणी पत्र जारी केल्यापासून साठ (६०) दिवसांच्या आत

रकमा भारतीय रुपयेमध्ये

अ. क्र.	मालमत्तेचे वर्णन	मालमत्ता आयडी	लिलाव आयडी	राखीव किंमत*	इसारा अनामत रक्कम (ईएमडी)	वाढीव मूल्य
१	मुंबई येथे स्थित इंजिनिअरिंग कन्स्युमेबल्स इन्व्हेंटरी	4620	4864	२,०२,६९,८४,४२४	२०,२६,९८,४४२	१०,१३,४९,२२१
२	दिल्ली वेअरहाऊसमध्ये स्थित लॅपटॉप, आयपॅड्स, प्रिंटर्स इत्यादींसह आयटी इन्व्हेंटरी	4619	4862	३३,९५,२३१	३,३९,५२३	१,६९,७६२

*यामध्ये इतर बाबींबरोबरच, विक्री पूर्ण करण्यासाठी लागणारे कर, लेव्ही, शुल्क, ड्युटी, हस्तांतरण शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, प्रीमियम आणि इतर सर्व लागू खर्चांचा समावेश नाही, ज्याचे अधिक तपशीलवार वर्णन संबंधित एएसपीएमच्या कलम १९ (खर्च, व्यय आणि कर परिणाम) मध्ये केले आहे. खालील स्वाक्षरीकर्त्यांद्वारे किंवा नुकसानभरपाई दिलेल्या पक्षकारांद्वारे (संबंधित एएसपीएममध्ये परिभाषित केल्यानुसार) कोणतेही सादरीकरण, हमी किंवा नुकसानभरपाई दिली जाणार नाही.

महत्त्वाच्या नोंदीः

१. बँकनेट पोर्टलवर वर सूचीबद्ध केलेल्या २ (दोन) मालमत्तांसाठी २ (दोन) स्वतंत्र ई-लिलाव आयोजित केले जातील.
२. ही विक्री नोटीस संबंधित एएसपीएम सोबत वाचली जावी, ज्यामध्ये मालमत्तांचा तपशील, घोषणा, प्रतिज्ञापत्रे आणि आयबीसीच्या कलम २९ए अंतर्गत पात्रतेसाठी हमीपत्रे, आणि 'ई-लिलाव विक्रीच्या सामान्य आणि तांत्रिक अटी व शर्ती' समाविष्ट आहेत, जे वरील मालमत्ता आणि लिलाव आयडीच्या विरुद्ध बँकनेटवर https://ibbi.baanknet.com/auction-listing येथे किंवा कॉर्पोरेट ऋणकोच्या www.jetairways.com या वेबसाईटवर उपलब्ध आहेत.
३. सर्व परदेशी बोलीदारांनी त्यांच्या सहभागासाठी संबंधित एएसपीएमच्या पुरवणीची नोंद घ्यावी. परदेशी बोलीदारांना विशेषतः विनंती करण्यात येते की त्यांनी दिनांक १२ सप्टेंबर २०२६ च्या संबंधित एएसपीएमच्या पुरवणीमध्ये नमूद केलेल्या विहित नोंदणी प्रक्रिया, वेळापत्रक, पात्रता निकष आणि ईएमडी सादर करण्याच्या आवश्यकतांचे पालन करावे.
४. इच्छुक बोलीदारांनी संबंधित एएसपीएमच्या कलम ४ (पात्रता कागदपत्रे) नुसार आवश्यक पात्रता कागदपत्रे आणि ईएमडी केवळ आणि काटेकोरपणे ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारेच विहित वेळेत सादर करावेत, लिक्विडेटरकडे (परिसमापकाकडे) नाही.
५. ई-लिलाव प्लॅटफॉर्म आणि कागदपत्रे व ईएमडी सादर करण्याबाबत कोणतीही शंका असल्यास, इच्छुक बोलीदारांना बँकनेटशी +९१ ८२९१२२०२२० वर आणि support.baanknet@psballiance.com वर संपर्क साधण्याची विनंती आहे.
६. ई-लिलावाबाबत कोणत्याही प्रश्नांसाठी, कृपया लिक्विडेटरचे प्राधिकृत प्रतिनिधी, श्री. श्लोक नंदनपवार (+९१-८२०८५०३६९३) यांच्याशी jetliquidation@in.ey.com आणि liquidation.jet@gmail.com वर संपर्क साधावा, ज्याचा विषय योग्यतेनुसार "अभियांत्रिकी मालमत्ता विक्री - मुंबई (उपभोग्य वस्तू)" किंवा "आयटी मालमत्ता - दिल्ली" असावा. कृपया नोंद घ्यावी की, पात्रता किंवा बोलीशी संबंधित कोणतीही कागदपत्रे लिक्विडेटर, त्यांचे प्रतिनिधी किंवा त्यांच्या सल्लागारांकडे सादर केली जाऊ नयेत.
७. याद्वारे स्पष्ट करण्यात येते की, ही नोटीस खालील स्वाक्षरीकर्ते किंवा जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड (परिसमापनात) यांच्यावर विक्री पूर्ण करण्यासाठी कोणतेही बंधनकारक दायित्व निर्माण करत नाही. खालील स्वाक्षरीकर्त्यांनी घेतलेला कोणताही निर्णय अंतिम आणि सर्व इच्छुक बोलीदारांवर बंधनकारक असेल.
८. याद्वारे स्पष्ट करण्यात येते की, येथे आणि संबंधित एएसपीएममध्ये दिलेला मालमत्तांचा तपशील केवळ सामान्य संदर्भासाठी दिलेला आहे. नुकसानभरपाई दिलेले पक्षकार (संबंधित एएसपीएममध्ये परिभाषित केल्यानुसार) मालमत्तांच्या वर्णनातील किंवा स्थितीतील कोणत्याही प्रकारची कमतरता/अचूकतेचा अभाव/विसंगती/चुकीचे विधान/वगळलेली माहिती/तफावत/घट किंवा त्रुटीसाठी कोणतीही जबाबदारी किंवा दायित्व स्पष्टपणे नाकारतात आणि यासाठी ते जबाबदार राहणार नाहीत, मग अशी विसंगती ई-लिलाव पूर्ण होण्यापूर्वी, दरम्यान किंवा नंतर आढळून आली असो वा नसो. मालमत्तांची विक्री काटेकोरपणे 'जसे आहे जिथे आहे', 'जसे आहे जे आहे', 'जसे आहे तसे आहे', आणि 'कोणत्याही दाव्याशिवाय' या तत्त्वावर आणि कोणत्याही सादरीकरण, हमी किंवा नुकसानभरपाईशिवाय केली जात आहे.
९. अंतिम विक्री मोबदल्याचे पेमेंट हे संबंधित एएसपीएमच्या कलम १५ (अंतिम विक्री मोबदल्याचे पेमेंट) आणि १६ (विक्री पूर्ण करणे) मध्ये नमूद केलेल्या वेळापत्रक, व्याजाच्या तरतुदी आणि जप्तीच्या अटींच्या अधीन आहे.
१०. लिक्विडेटर, कॉर्पोरेट ऋणकोच्या कमिटी ऑफ क्रेडिटर्सच्या सल्ल्यानुसार, लागू कायद्यांतर्गत अन्यथा प्रदान केल्याखेरीज कोणतेही कारण न देता ई-लिलाव प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचा किंवा थांबवण्याचा अधिकार राखून ठेवतात.

सही/-
सतीश कुमार गुप्ता
लिक्विडेटर, जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड
आयपी नोंदणी क्र.: IBBI/IPA-001/IP-P00023/2016-17/10056
एएफए क्र.: AA1/10056/02/311226/108454
एएफएची वैधता ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत
ई-मेल - liquidation.jet@gmail.com

दिनांकः १२.०९.२०२६
ठिकाणः मुंबई

डीलर्स आणि वितरकांची आवश्यकता आहे

दिल्लीस्थित (१० वर्षे जुना) आणि वेगाने विस्तारत असलेला एक प्रस्थापित सीपी बाथरूम फिटिंग्ज ब्रँड, त्यांच्या क्षेत्रात मार्केटिंगवर चांगली पकड असलेल्या आर्थिकदृष्ट्या सक्षम वितरक / डीलर्ससोबत भागीदारी करू इच्छित आहे. नियुक्त केलेले वितरक / डीलर त्यांच्या क्षेत्रातील विक्रीसाठी पूर्णपणे जबाबदार असतील. आम्ही विक्रीसाठी साहाय्य, आकर्षक प्रॉफिट मार्जिन्स, उद्दिष्टांवर आधारित इन्सेंटिव्हज, वेळेवर डिलिव्हरी आणि वॉरंटीयुक्त दर्जेदार उत्पादने देऊ. जर तुमची या व्यवसायाच्या संधीसोबत प्रगती करण्याची महत्त्वाकांक्षा असेल, तर आमच्याशी जोडले जा.

कॉल / व्हॉट्सअॅप - ९६२५०८१०३२

जाहीर सूचना

या सूचनेद्वारे कळविण्यात येते की, दिनांक २० जानेवारी १९९४ रोजीचा मूळ करारनामा जो कल्याण दुय्यम निबंधक कार्यालयात अनुक्रमांक ९५०५/९५ अन्वये नोंदणीकृत आहे, जो कालू नगर, ठाकूर वाडी क्रॉस लेन, डोंबिवली (पश्चिम), तालुका कल्याण, जिल्हा ठाणे - ४२१२०२ येथील शिवाजी पार्क को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि. च्या "कृष्ण" नावाच्या इमारतीमधील २ या मजल्यावरील फ्लॅट क्र. १०, ज्याचे क्षेत्रफळ ५०० चौ. फूट (बिल्ट अप) आहे ("सदर मालमत्ता"), सदर मालमत्तेचे माजी मालक म्हणजेच श्री. एम. पांडुरंग कामत यांच्या नावावर आहे, तो हरवला आहे/बी.एम.सी. कडे जमा झालेला आहे आणि आता सध्याचे मालक श्रीमती मनीषा दिलीप वोरा व श्री. दिलीप भोगीलाल वोरा हे सदर मालमत्तेची विक्री करू इच्छितात. सदर मालमत्ता आणि/किंवा कराराबाबत कोणत्याही प्रकारचा दावा असलेल्या कोणत्याही व्यक्तीस याद्वारे ही सूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत योग्य पुराव्यासह दावा दाखल करण्याचे आवाहन करण्यात येत आहे, अन्यथा सदर मालमत्ता कोणत्याही प्रकारच्या दाव्यांपासून मुक्त मानली जाईल.

सही/-
अॅडव्होकेट प्राची शाह
५५८/०१, चारकोप, सेक्टर-५, कांदिवली (पश्चिम), मुंबई - ४०००६७. ई-मेलः shahprachi1992@gmail.com
दिनांकः १२.०९.२०२६ ठिकाणः मुंबई

जाहीर नोटीस

याद्वारे सर्वसामान्य जनतेला नोटीस देण्यात येते की, कंपनीज अॅक्ट, २०१३ च्या तरतुदींअंतर्गत स्थापन झालेली आणि जिचे नोंदणीकृत कार्यालय ४१/४४, शापूरजी पालोनजी सेंटर, मीनू देसाई मार्ग, कुलाबा, मुंबई-४००००५ येथे आहे अशी कंपनी, जॉयविले शापूरजी हाऊसिंग प्रायव्हेट लिमिटेड ("कंपनी"), ने "जॉयविले सेलेस्टिया-फेज ६" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रकल्पातील टॉवर टी०७ च्या १९ व्या मजल्यावरील निवासी फ्लॅट क्र. १९०७, जो मौजे शेवाळवाडी, तालुका हवेली, जिल्हा पुणे-४१२३०७ येथे स्थित आहे ("सदर फ्लॅट") या संदर्भात, सौ. शैलजा किरण होळकर, रा. टी३-१३०५, जॉयविले हडपसर अॅनेक्सी, शेवाळवाडी, पुणे-४१२३०७ यांच्या नावे दिनांक २७.१२.२०२४ रोजीचा एक विक्री करार (अॅग्रीमेंट फॉर सेल) केला होता, जो हवेली-VII येथील सह-दुय्यम निबंधक (अश्युरन्स) यांच्याकडे रीतसर नोंदणीकृत असून त्याचा नोंदणी अनुक्रमांक HVL6-26393-2024 असा आहे ("विक्री करार").

सौ. शैलजा किरण होळकर यांना अनेक स्मरणपत्रे, संपुष्टात आणल्याची नोटीस (टर्मिनेशन नोटीस), आणि त्यानंतर दिनांक २४.०६.२०२६ रोजीची सावधगिरीची नोटीस (कॉशनरी नोटीस) बजावण्यात आली होती. तथापि, त्या त्याचे पालन करण्यात अयशस्वी ठरल्या. त्यानुसार, विक्री करार संपुष्टात आला आहे, आणि सदर फ्लॅटच्या संदर्भात सौ. शैलजा किरण होळकर यांचा कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध किंवा कोणताही दावा शिल्लक राहिलेला नाही.

याद्वारे सर्वसामान्य जनतेला सावध करण्यात येते की, त्यांनी सदर फ्लॅटच्या संदर्भात सौ. शैलजा किरण होळकर यांच्याकडून किंवा त्यांच्यामार्फत खरेदी, वाटाघाटी, गहाण, कोणताही प्रभार, धारणाधिकार (लियन), बोजा, भाडेकरू हक्क, लिव्ह अँड लायसन्स, हस्तांतरण (असाइनमेंट) निर्माण करू नये किंवा इतर कोणताही व्यवहार करू नये किंवा कोणत्याही हक्काचा दावा करू नये. सदर खरेदीदारासोबत व्यवहार करणारी किंवा त्यांच्यामार्फत दावा करणारी कोणतीही व्यक्ती हे पूर्णपणे तिच्या/त्याच्या स्वतःच्या जोखमीवर, खर्चावर आणि परिणामांवर करेल, आणि अशा कोणत्याही व्यवहारासाठी किंवा व्यवस्थेसाठी कंपनी जबाबदार किंवा बांधील राहणार नाही.

आम्ही सर्वसामान्य जनतेला पुढे असेही सूचित करतो की, कंपनी सदर फ्लॅटच्या संदर्भात स्वतःच्या विवेकबुद्धीनुसार व्यवहार करण्यास स्वतंत्र असेल आणि तशी कार्यवाही करू शकेल.

दिनांकः ०५/०९/२०२६
ठिकाणः पुणे / मुंबई

सुनीलराजा नाडर अँड असोसिएट्स करिता
सही/-
(सुनीलराजा नाडर)
अॅडव्होकेट हायकोर्ट पत्ताः ५०२, ५ वा मजला, निर्मल कॉर्पोरेट सेंटर, एलबीएस रोड, मुलुंड (पश्चिम), मुंबई-४०००८०.
मोबाईल क्र.: ९९३०९०९५३४
ईमेलः sunilrajar09@gmail.com

जाहीर नोटीस

याद्वारे सर्वसामान्य जनतेला नोटीस देण्यात येते की, कंपनीज अॅक्ट, २०१३ च्या तरतुदींअंतर्गत स्थापन झालेली आणि जिचे नोंदणीकृत कार्यालय ४१/४४, शापूरजी पालोनजी सेंटर, मीनू देसाई मार्ग, कुलाबा, मुंबई-४००००५ येथे आहे अशी कंपनी, जॉयविले शापूरजी हाऊसिंग प्रायव्हेट लिमिटेड ("कंपनी"), ने "जॉयविले हडपसर अॅनेक्स-फेज १०" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रकल्पातील टॉवर टी१८ च्या १४ व्या मजल्यावरील निवासी फ्लॅट क्र. १४०६, जो मौजे शेवाळवाडी, तालुका हवेली, जिल्हा पुणे-४१२३०७ येथे स्थित आहे ("सदर फ्लॅट") या संदर्भात, सौ. अलका अमित मोरे, रा. सर्व्हे क्र. ४६, मांजरी फार्म रोड, काळूबाई मंदिराजवळ, मोरे वस्ती, मांजरी बुद्रुक, पुणे-४१२३०७ यांच्या नावे दिनांक २४.०२.२०२१ रोजीचा एक विक्री करार (अॅग्रीमेंट फॉर सेल) केला होता, जो हवेली-VII येथील सह-दुय्यम निबंधक (अश्युरन्स) यांच्याकडे रीतसर नोंदणीकृत असून त्याचा नोंदणी अनुक्रमांक HVL7-1602-2021 असा आहे ("विक्री करार").

सौ. अलका अमित मोरे यांना अनेक स्मरणपत्रे, **संपुष्टात आणल्याची नोटीस (टर्मिनेशन नोटीस)**, आणि त्यानंतर **दिनांक २१.११.२०२५** रोजीची **सावधगिरीची नोटीस** (कॉशनरी नोटीस) बजावण्यात आली होती. तथापि, त्या त्याचे पालन करण्यात अयशस्वी ठरल्या. त्यानुसार, विक्री करार संपुष्टात आला आहे, आणि सदर फ्लॅटच्या संदर्भात सौ. अलका अमित मोरे यांचा कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध किंवा कोणताही दावा शिल्लक राहिलेला नाही.

याद्वारे सर्वसामान्य जनतेला सावध करण्यात येते की, त्यांनी सदर फ्लॅटच्या संदर्भात **सौ. अलका अमित मोरे** यांच्याकडून किंवा त्यांच्यामार्फत खरेदी, वाटाघाटी, गहाण, कोणताही प्रभार, धारणाधिकार (लियन), बोजा, भाडेकरू हक्क, लिव्ह अँड लायसन्स, हस्तांतरण (असाइनमेंट) निर्माण करू नये किंवा इतर कोणताही व्यवहार करू नये किंवा कोणत्याही हक्काचा दावा करू नये. सदर खरेदीदारासोबत व्यवहार करणारी किंवा त्यांच्यामार्फत दावा करणारी कोणतीही व्यक्ती हे पूर्णपणे तिच्या/त्याच्या स्वतःच्या जोखमीवर, खर्चावर आणि परिणामांवर करेल, आणि अशा कोणत्याही व्यवहारासाठी किंवा व्यवस्थेसाठी कंपनी जबाबदार किंवा बांधील राहणार नाही.

आम्ही सर्वसामान्य जनतेला पुढे असेही सूचित करतो की, कंपनी सदर फ्लॅटच्या संदर्भात स्वतःच्या विवेकबुद्धीनुसार व्यवहार करण्यास स्वतंत्र असेल आणि तशी कार्यवाही करू शकेल.

दिनांकः १२/०९/२०२६
ठिकाणः पुणे / मुंबई

सुनीलराजा नाडर अँड असोसिएट्स करिता
सही/-
(सुनीलराजा नाडर)
अॅडव्होकेट हायकोर्ट
पत्ताः ५०२, ५ वा मजला, निर्मल कॉर्पोरेट सेंटर, एलबीएस रोड, मुलुंड (पश्चिम), मुंबई-४०००८०.
मोबाईल क्र.: ९९३०९०९५३४

फॉर्म क्र. ३ [नियम १३ (१)(ए) पहा]

कर्ज वसुली न्यायाधिकरण मुंबई (डीआरटी ३)

१ ला मजला, एमटीएनएल टेलिफोन एक्स्चेंज बिल्डिंग, सेक्टर-३० ए, वाशी, नवी मुंबई - ४००७०३
प्रकरण क्र.: ओए/१/२०२६
कर्ज वसुली न्यायाधिकरण (प्रक्रिया) नियम, १९९३ च्या नियम ५ च्या उप-नियम (२ए) सह वाचल्या जाणाऱ्या कायद्याच्या कलम १९ च्या उप-कलम (४) अंतर्गत समन्स.

बँक ऑफ बडोदा
विरुद्ध निशानी क्र.: ९
जय कन्स्ट्रक्शन पाटील

प्रति,
(१) **जय कन्स्ट्रक्शन पाटील,**
डी/डब्ल्यू/एस/ओ - जय विजय पाटील घर क्र. ६७५, अंबाडी, भिवंडी, ठाणे - ४२१३०२, ठाणे, महाराष्ट्र - ४२१३०२

समन्स

ज्याअर्थी, **ओए/१/२०२६ दिनांक ०२/०१/२०२६ रोजी** माननीय पीठासीन अधिकारी / निबंधक यांच्यासमोर सुनावणीसाठी सूचीबद्ध करण्यात आले होते.

ज्याअर्थी, हे माननीय न्यायाधिकरण **रु. २४,०५,४८३.८३/-** च्या कर्ज वसुलीसाठी तुमच्याविरुद्ध दाखल केलेल्या कायद्याच्या कलम १९(४) अंतर्गत सदर अर्जावर (ओए) समन्स/नोटीस बजावण्यास सहमत आहे (अर्जासोबत कागदपत्रांच्या प्रती इत्यादी जोडल्या आहेत).

कायद्याच्या कलम १९ च्या उप-कलम (४) नुसार, तुम्हाला, प्रतिवादींना खालीलप्रमाणे निर्देश दिले जात आहेतः-
(i) समन्स बजावल्यापासून तीस दिवसांच्या आत कारणे दाखवा की, अर्जात मागितलेला दिलासा का मंजूर केला जाऊ नये;
(ii) मूळ अर्जाच्या अनुक्रमांक ३ए अंतर्गत अर्जदाराने निर्दिष्ट केलेल्या मालमत्ता आणि अॅसेट्सव्यतिरिक्त इतर मालमत्ता किंवा अॅसेट्सचा तपशील उघड करणे;
(iii) मालमत्ता जप्त करण्याच्या अर्जावर सुनावणी आणि तो निकाली निघेपर्यंत, मूळ अर्जाच्या अनुक्रमांक ३ए अंतर्गत उघड केलेल्या तारण अॅसेट्स किंवा अशा इतर अॅसेट्स आणि मालमत्तांसोबत व्यवहार करण्यास किंवा त्यांची विल्हेवाट लावण्यास तुम्हाला मनाई आहे;
(iv) न्यायाधिकरणाच्या पूर्वपरवानगीशिवाय, ज्यांवर सुरक्षा हित (सिक्युरिटी इंटरेस्ट) निर्माण केले आहे अशा कोणत्याही अॅसेट्स आणि/किंवा मूळ अर्जाच्या अनुक्रमांक ३ए अंतर्गत निर्दिष्ट केलेल्या किंवा उघड केलेल्या इतर अॅसेट्स आणि मालमत्तांचे, व्यवसायाच्या सामान्य ओघाव्यतिरिक्त, विक्री, भाडेपट्टा किंवा इतर कोणत्याही मार्गाने हस्तांतरण करणार नाही;
(v) व्यवसायाच्या सामान्य ओघात तारण अॅसेट्स किंवा इतर अॅसेट्स आणि मालमत्तांच्या विक्रीतून मिळवलेल्या रकमेचा हिशोब देण्यास तुम्ही जबाबदार असाल आणि अशी विक्रीची रक्कम अशा अॅसेट्सवर सुरक्षा हित धारण करणाऱ्या बँक किंवा वित्तीय संस्थांकडे असलेल्या खात्यात जमा कराल.

तुम्हाला लेखी म्हणणे दाखल करण्याचे, त्याची एक प्रत अर्जदाराला देण्याचे आणि **दिनांक १७/०९/२०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता** निबंधकांसमोर उपस्थित राहण्याचे निर्देशही दिले जात आहेत, तसे न केल्यास तुमच्या अनुपस्थितीत अर्जाची सुनावणी घेतली जाईल आणि निर्णय दिला जाईल.

आज **दिनांकः** ०७/०८/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीने आणि या न्यायाधिकरणाच्या शिक्क्यानिशी दिले.

SEAL

समन्स जारी करण्यासाठी प्राधिकृत अधिकाऱ्याची स्वाक्षरी.
(संजय जैस्वाल) निबंधक
डीआरटी-३, मुंबई.

टीपः जे लागू नसेल ते खोडून टाका.

फॉर्म क्र. ३ [नियम १३ (१)(ए) पहा]

कर्ज वसुली न्यायाधिकरण मुंबई (डीआरटी ३)

१ ला मजला, एमटीएनएल टेलिफोन एक्स्चेंज बिल्डिंग, सेक्टर-३० ए, वाशी, नवी मुंबई - ४००७०३
प्रकरण क्र.: ओए/२/२०२६ निशानी क्र.: ९
कर्ज वसुली न्यायाधिकरण (प्रक्रिया) नियम, १९९३ च्या नियम ५ च्या उप-नियम (२ए) सह वाचल्या जाणाऱ्या कायद्याच्या कलम १९ च्या उप-कलम (४) अंतर्गत समन्स.

बँक ऑफ बडोदा
विरुद्ध
मे. जय शंभो नारायण एंटरप्रायझेस अवघडे

प्रति,
(१) **मे. जय शंभो नारायण एंटरप्रायझेस अवघडे**
डी/डब्ल्यू/एस/ओ - प्रज्योत वसंत, खोली क्र. १७४, चाळ क्र. ६, आनंद नगर, कोपरी ब्रिगेडजवळ, ठाणे - ४००६०३ ठाणे, महाराष्ट्र - ४००६०३

समन्स

ज्याअर्थी, **ओए/२/२०२६ दिनांक** ०२/०१/२०२६ रोजी माननीय पीठासीन अधिकारी / निबंधक यांच्यासमोर सुनावणीसाठी सूचीबद्ध करण्यात आले होते.

ज्याअर्थी, हे माननीय न्यायाधिकरण **रु. ३४,२६,५१७.७६/-** च्या कर्ज वसुलीसाठी तुमच्याविरुद्ध दाखल केलेल्या कायद्याच्या कलम १९(४) अंतर्गत सदर अर्जावर (ओए) समन्स/नोटीस बजावण्यास सहमत आहे (अर्जासोबत कागदपत्रांच्या प्रती इत्यादी जोडल्या आहेत).

कायद्याच्या कलम १९ च्या उप-कलम (४) नुसार, तुम्हाला, प्रतिवादींना खालीलप्रमाणे निर्देश दिले जात आहेतः-
(i) समन्स बजावल्यापासून तीस दिवसांच्या आत कारणे दाखवा की, अर्जात मागितलेला दिलासा का मंजूर केला जाऊ नये;
(ii) मूळ अर्जाच्या अनुक्रमांक ३ए अंतर्गत अर्जदाराने निर्दिष्ट केलेल्या मालमत्ता आणि अॅसेट्सव्यतिरिक्त इतर मालमत्ता किंवा अॅसेट्सचा तपशील उघड करणे;
(iii) मालमत्ता जप्त करण्याच्या अर्जावर सुनावणी आणि तो निकाली निघेपर्यंत, मूळ अर्जाच्या अनुक्रमांक ३ए अंतर्गत उघड केलेल्या तारण अॅसेट्स किंवा अशा इतर अॅसेट्स आणि मालमत्तांसोबत व्यवहार करण्यास किंवा त्यांची विल्हेवाट लावण्यास तुम्हाला मनाई आहे;
(iv) न्यायाधिकरणाच्या पूर्वपरवानगीशिवाय, ज्यांवर सुरक्षा हित (सिक्युरिटी इंटरेस्ट) निर्माण केले आहे अशा कोणत्याही अॅसेट्स आणि/किंवा मूळ अर्जाच्या अनुक्रमांक ३ए अंतर्गत निर्दिष्ट केलेल्या किंवा उघड केलेल्या इतर अॅसेट्स आणि मालमत्तांचे, व्यवसायाच्या सामान्य ओघाव्यतिरिक्त, विक्री, भाडेपट्टा किंवा इतर कोणत्याही मार्गाने हस्तांतरण करणार नाही;
(v) व्यवसायाच्या सामान्य ओघात तारण अॅसेट्स किंवा इतर अॅसेट्स आणि मालमत्तांच्या विक्रीतून मिळवलेल्या रकमेचा हिशोब देण्यास तुम्ही जबाबदार असाल आणि अशी विक्रीची रक्कम अशा अॅसेट्सवर सुरक्षा हित धारण करणाऱ्या बँक किंवा वित्तीय संस्थांकडे असलेल्या खात्यात जमा कराल.

तुम्हाला लेखी म्हणणे दाखल करण्याचे, त्याची एक प्रत अर्जदाराला देण्याचे आणि **दिनांक १७/०९/२०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता** निबंधकांसमोर उपस्थित राहण्याचे निर्देशही दिले जात आहेत, तसे न केल्यास तुमच्या अनुपस्थितीत अर्जाची सुनावणी घेतली जाईल आणि निर्णय दिला जाईल.

आज दिनांकः ०७/०८/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीने आणि या न्यायाधिकरणाच्या शिक्क्यानिशी दिले.

SEAL

समन्स जारी करण्यासाठी प्राधिकृत अधिकाऱ्याची स्वाक्षरी.
(संजय जैस्वाल)
निबंधक डीआरटी-३, मुंबई.

टीपः जे लागू नसेल ते खोडून टाका.

सीआर क्र. ३१ (माझगाव)

मुंबई येथील मुंबई शहर दिवाणी न्यायालयात

कमर्शियल समरी सूट क्र. ४७८/२०२३
(१९०८ च्या दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ५ नियम २० (१-ए) अंतर्गत)

वादपत्र दाखल केल्याची तारीख : १५/०७/२०२६
वादपत्र दाखल करून घेतल्याची तारीखः ०५/१२/२०२३

दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या आदेश XXXVII नियम २ अंतर्गत वादपत्राला उत्तर देण्यासाठी समन्स.

युनियन बँक ऑफ इंडिया,
बँकिंग कंपनीज (अॅक्विझिशन अँड ट्रान्सफर ऑफ अंडरटेकिंग्ज) अॅक्ट, १९७० च्या तरतुदींअंतर्गत स्थापन झालेली एक कॉर्पोरेट संस्था, जिचे कार्यालय युनियन बँक बिल्डिंग, ६ वा मजला, ६६/८० मुंबई समाचार मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ०२३ येथे आहे आणि इतर शाखांसोबत युनियन बँक ऑफ इंडिया, फर्जांदी बिल्डिंग, ३५५-ए, मौलाना शौकत अली रोड, ग्रँट रोड, मुंबई, महाराष्ट्र ४००००७ येथे एक शाखा कार्यालय आहे, त्यांचे प्रतिनिधित्व त्यांचे वरिष्ठ व्यवस्थापक श्री. मनीष कुमार शर्मा, वय ३४ वर्षे यांच्याद्वारे.

...वादी

विरुद्ध

१. मे. वैभव टूर्स अँड ट्रॅव्हल्स,
२. प्रोप्रा. श्री. वैभव व्ही मोरे वयः ३४, व्यवसायः व्यापार, पत्ताः - ४९८, त्रिमूर्ती सोसायटी, विजय नगर, वर्तक नगर, ठाणे, महाराष्ट्र, ४००६०६

...प्रतिवादी

प्रति,
१. मे. वैभव टूर्स अँड ट्रॅव्हल्स,
२. प्रोप्रा. श्री. वैभव व्ही मोरे वर नमूद केलेले प्रतिवादी.
(न्यायालय कक्ष क्र. ३१ मधील पीठासीन न्यायाधीश श्री. एन. बी. लवटे साहेब यांच्या दिनांक २९.०६.२०२६ रोजीच्या आदेशानुसार)

ज्याअर्थी, वर नमूद केलेल्या वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या आदेश XXXVII च्या नियम २ अंतर्गत वर नमूद केलेले प्रतिवादी असलेल्या तुमच्या विरुद्ध माननीय न्यायालयात दावा दाखल केला आहे.

अ. त्यामुळे, वादी खालीलप्रमाणे प्रार्थना करत आहेतः -
अ. या माननीय न्यायालयाने प्रतिवादींविरुद्ध संयुक्तपणे आणि वैयक्तिकरित्या वादीला रु. ५,५५,८१९.४४/- {कर्ज खाते क्र. 317206120000017 रु. ५,५५,८१९.४४/- (अक्षरी रुपये पाच लाख पंचावन्न हजार आठशे एकोणीस आणि चव्वेचाळीस पैसे मात्र) आणि त्यावरील एनपीए च्या तारखेपासून ते प्रत्यक्ष वसुली होईपर्यंत म्हणजेच दावा दाखल केल्याच्या तारखेपासून ते सोबत जोडलेल्या दाव्याच्या तपशिलानुसार म्हणजेच एक्झिबिट "एल" नुसार प्रत्यक्ष पेमेंट/वसुलीच्या तारखेपर्यंत ११.४५% + २.००% दराने पुढील व्याज अधिक आकारले न गेलेले व्याज आणि दंडात्मक व्याज देण्याचा आदेश आणि हुकूमनामा पारित करण्याची कृपा करावी.
ब. या माननीय न्यायालयाने प्रतिवादींची थकीत देय रक्कम भागवण्यासाठी त्यांच्या मालकीच्या प्रभारित आणि अप्रभारित मालमत्तांच्या विक्रीतून मिळणाऱ्या रकमेचे समायोजन करण्यासाठी निकालापूर्वी मालमत्ता जप्तीचा (अटॅचमेंट) आदेश पारित करण्याची कृपा करावी.
क. पुढे अशी विनंती केली जात आहे की, प्रतिवादींना त्यांचा पासपोर्ट या माननीय न्यायालयात जमा करण्याचे निर्देश द्यावेत किंवा पर्यायी स्वरूपात या माननीय न्यायालयाच्या पूर्वपरवानगीशिवाय देश न सोडण्याचे निर्देश द्यावेत.
ड. प्रतिवादींना या दाव्याचा खर्च भरण्याचे निर्देश दिले जावेत.
इ. या प्रकरणाचे स्वरूप आणि परिस्थितीनुसार कोणताही पुढील योग्य दिलासा दिला जावा.

याद्वारे तुम्हाला समन्स बजावण्यात येत आहे की, तुम्ही हे समन्स मिळाल्यापासून दहा दिवसांच्या आत तुमच्यासाठी उपस्थिती नोंदवावी, तसे न केल्यास सदर दहा दिवसांची मुदत संपल्यानंतर कोणत्याही वेळी वादी रु. ५,५५,८१९.४४/- (अक्षरी रुपये पाच लाख पंचावन्न हजार आठशे एकोणीस आणि चव्वेचाळीस पैसे मात्र) च्या रकमेसाठी आणि प्रार्थना केल्यानुसार रकमेसाठी आणि खर्चासाठी, सोबत माननीय न्यायालय आदेश देईल अशा कोणत्याही व्याजासह हुकूमनामा प्राप्त करण्यास पात्र राहतील.

जर तुम्ही तुमच्यासाठी उपस्थिती नोंदवलीत, तर वादी त्यानंतर तुमच्यावर निकालासाठी समन्स (समन्स फॉर जजमेंट) बजावतील, ज्याच्या सुनावणीच्या वेळी तुम्हाला या माननीय न्यायालयाकडे या दाव्याचा बचाव करण्यासाठी परवानगी मागण्याचा अधिकार असेल.

जर तुम्ही प्रतिज्ञापत्राद्वारे किंवा अन्य मार्गाने या माननीय न्यायालयाची खात्री पटवलीत की गुणवत्तेनुसार या दाव्याला बचाव आहे किंवा तुम्हाला या दाव्याचा बचाव करण्याची परवानगी देणे रास्त आहे, तर बचाव करण्याची परवानगी मिळवता येऊ शकेल.

माझ्या स्वाक्षरीने आणि या माननीय न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आज दिनांक **२० ऑगस्ट २०२६ रोजी दिले**

Seal

शिक्का प्रबंधकांकरिता.
शहर दिवाणी न्यायालय, मुंबई

अॅड. डॉ. ज्योती पाटकर, वादीच्या वकील, फ्लॅट क्र. डी/२०३, २ रा मजला, युगंधर सुदामा, नाना-नानी पार्कसमोर, मानपाडा रोड, डोंबिवली पूर्व, ठाणे ४२१ २०१.
ईमेलः advjyotipatkar27@gmail.com मोबाः ८९७६१४३१३०

याद्वारे तुम्हाला सूचित करण्यात येते की, राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय विधी सेवा समिती, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि तालुका विधी सेवा समिती यांच्याकडून पात्रतेच्या निकषांनुसार मोफत कायदेशीर सेवा तुमच्यासाठी उपलब्ध आहेत आणि जर तुम्ही पात्र असाल आणि तुम्हाला मोफत कायदेशीर सेवांचा लाभ घेण्याची इच्छा असेल, तर तुम्ही वरीलपैकी कोणत्याही विधी सेवा प्राधिकरणाशी/समितीशी संपर्क साधू शकता.

वादीच्या वकिलाची स्वाक्षरी.

टीपः या दाव्याची पुढील तारीख २१/०९/२०२६ आहे. कृपया या दाव्याची स्थिती आणि पुढील/पुढची तारीख शहर दिवाणी आणि सत्र न्यायालय, ग्रेटर मुंबई च्या अधिकृत वेबसाईटवर तपासा.